**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक :-२०/७/२०२६**

---

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये सोमवार दिनांक २० जुलै २०२६ रोजी दुपारी ३:०० ( तीन ) वाजता भरलेल्या माहे जुलै २०२६ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/१२३**

संदर्भ – १) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.३७४,दि.२४/३/२००५
२) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.२५१,दि.२४/८/२०१५
३) मे.केंद्र शासन पथविक्रेता अधिनियम ( उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन ) २०१४ अन्वये मा.शहर फेरीवाला समिती सभा दि.३०/३/२०१५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तामधील विषय क्र.१० ची मान्यता
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/११४,दि.२७/६/२०१९ चे पत्र.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/२२६,दि.२९/६/२०२६ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६८,दि.२/७/२०२६

विषय– पुणे महानगरपालिकेकडील अधिकृत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र/परवाना वारस व्यक्तीस हस्तांतरण करणेबाबत.

----

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन व मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

विषयांकित प्रकरणी वारस परवाना वर्ग करणे प्रकरणी मा.स्थायी समितीने मान्य केलेला ठराव क्र.४९६, दि.१६/७/२०१९ हा कायम ठेवून फेरप्रस्तावातील खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी म.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मा.महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.३७४,दि.२४/३/२००५ निरस्त करणेस.

२) नोंदणीकृत पथविक्रेत्याचा मृत्यू झाल्यास अथवा त्यास कायमचे अपंगत्व आल्यास अथवा आजारी असल्यास त्याचे नावावरील नोंदणी प्रमाणपत्र / परवाना खालील प्राधान्यक्रमाने वारसाचे नावे वर्ग करणेस.

अ) पथ विक्रेत्याचे पती अथवा पत्नी

ब) पथ विक्रेत्यावर अवलंबून असलेली त्यांची मुले.

३) पथ विक्रेत्याच्या वारसाचे नावे नोंदणी प्रमाणपत्र/परवाना वर्ग करणेकरिता पथविक्रेता अधिनियम २०१४ चे तरतुदीनुसार मा.शहरफेरीवाला समितीच्या दि.३०/३/२०१५ रोजीच्या बैठकीत मान्य केलेले वारस परवाना वर्ग शुल्क र.रू.१०००/– आकारणेस.

**विषय क्र.२/१२४**

संदर्भ – १) मा.तन्वी दिवेकर व मा.सई थोपटे यांचे दि.२३/६/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०६८,दि.२३/३/२०२६
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व.व्य./२०४,दि.२५/६/२०२६ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७९,दि.२/७/२०२६

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा.स्थायी समिती ठराव क्र.२०६८,दि.२७/३/२०२६ अन्वये प्राप्त झालेला अभिप्राय खालीलप्रमाणे – दि.२०/१/२०१६ रोजी मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिलेल्या आदेशानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभाग, भूसंपादन विभाग आणि विकास योजना विभागाकडील पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या मिळकतींच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी महसूल विभागाकडील निवृत्त अधिकारी सेवकांचा कक्ष स्थापन करून वास्तु पुस्तकामध्ये नोंद असलेल्या सर्व मिळकतींबाबत मालक म्हणून ७/१२ उतारा अथवा सिटी सर्व्हे, मालमत्ता पत्रकामध्ये पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद करण्यासाठी **१)** मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( इ) यांचेकडील नियुक्ती आदेश जा.क्र.अतिमआ (इ)/माव्य/२१४२, दि.३०/६/२०१७, **२)** मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( इ) यांचेकडील नियुक्ती आदेश जा.क्र. अतिमआ(इ)/माव्य/२५३७,दि.१८/१/२०१८ व **३)** मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( इ) यांचेकडील नियुक्ती आदेश जा.क्र.अतिमआ(इ)/माव्य/२३५७,दि.११/१/२०१९ अन्वये दि.१/७/२०१७ ते ३१/१२/२०१८ या कालावधीसाठी निवृत्त महसूल अधिकारी यांचे नियुक्ती आदेश काढण्यात आले होते.सदर नियुक्ती पथकाद्वारे मालमत्ता व व्यवस्थापन ,भूसंपादन व विकास योजना विभागाकडील मालमत्तांची पडताळणी करून नाव लावणे प्रलंबित असलेल्या ६१७८ प्रकरणांपैकी १९९० प्रकरणे मंजूर होऊन सदर मालमत्ता पत्रकांवर पुणे मनपाचे नाव लावण्यात आले आणि उर्वरित ४१८८ प्रकरणे नाव लावणे कामी सदर प्रस्ताव नगर भूमापन क्र.१ व २ आणि तहसील कार्यालय यांच्याकडे प्रलंबित आहेत. तथापि सदर पथकाची मुदत संपुष्टात आल्याने आणि कोविड १९ चा प्रादुर्भाव सुरू झाल्यामुळे उर्वरित कामकाज प्रलंबित राहिले आहे. पुणे महानगरपालिकेकडे मंजूर विकास योजना आराखडयातील विविध आरक्षणा खालील जागा तसेच नवीन रस्ते अथवा रस्ता रूंदीकरणाच्या जागा त्याचप्रमाणे मनपा अधिनियमातील कलम २०५ प्रमाणे आखण्यात आलेल्या रस्त्याखालील जागा टी.पी.स्कीमद्वारे, भूसंपादन व पुनर्वसन कायदा २०१३ नुसार आणि मालमत्ता व्यवस्थापन विभागामार्फत खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जाते.तसेच एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील तरतुदीनुसार बांधीव मिळकती तसेच झोपडपट्टी प्राधिकरणामार्फत अतिरिक्त ठरलेल्या सदनिका अशा विविध आरक्षण मार्गांनी खुल्या जागा व बांधीव मिळकती महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्या जातात.परंतु काही वेळा तत्कालीन कामकाज पध्दतीप्रमाणे बरीच प्रकरणे केवळ तडजोडीने समक्ष मिळकतधारकांशी चर्चा करून, ताबा यादी करून जागेचा ताबा महानगरपालिकेद्वारे घेतला आहे. तथापि मिळकत धारकांनी/मनपाने त्यावेळी रीतसर हस्तांतरण दस्त नोंदविलेला नाही. टी.पी.स्कीमनुसार मनपा मालकीच्या झालेल्या मिळकतीच्या मालमत्ता पत्रकावर पुणे महानगरपालिकेचे नाव दाखल होणे क्रमप्राप्त असून देखील काही प्रकरणात पुणे महानगरपालिकेचे नाव दाखल झालेले नाही. त्याचप्रमाणे वास्तु पुस्तकांमध्ये नोंद असलेल्या सर्व मिळकतींबाबत मालक ७/१२ उतारा अथवा सिटी सर्व्हे मालमत्ता पत्रकामध्ये महानगरपालिकेच्या नावाची नोंद आढळून येत नाही. त्यामुळे बऱ्याच ठिकाणच्या जागा खाजगी मालकांकडून महानगरपालिकेकडे मालकी हक्काने प्राप्त होऊन देखील केवळ हस्तांतरण दस्त नोंदणी व ७/१२ उतारा मिळकत पत्रकामध्ये महानगरपालिकेची नोंद करणे ही कामे पूर्ण न झाल्यामुळे अद्यापही संपादित क्षेत्र मूळ मालकाच्या नावे असल्याचे दिसून येते. त्यामुळे अशा महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेल्या जागांचा आरक्षणनिहाय प्रभावी विनियोग करण्यास अडचणी येत आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये महानगरपालिकेकडून महसूल विभागाकडे महानगरपालिकेची नोंद करण्याबाबत पत्र व्यवहार होऊन देखील महानगरपालिकेची नोंद मालक म्हणून झाली नसल्याचे दिसून येते. या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर सन २००८ पासून हस्तांतरण दस्त नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आलेली आहे.

मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडील मेंटेनन्स सर्व्हेअर यांचेकडून जागा ताब्यात घेणे, दस्त नोंदणी व महानगरपालिकेचे नाव सातबारा उताऱ्यावर / मालमत्ता पत्रकावर लावणे तसेच टीडीआर एफएसआय इत्यादी प्रकरणांमध्ये कार्यवाही करणे या स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते. मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील

आकृतीबंधामध्ये मेंटेनन्स सर्व्हेअर यांची एकूण २० पदे मंजूर आहेत. परंतु सद्यस्थितीमध्ये १९ पदे रिक्त असून, केवळ १ पदावर सेवक कार्यरत आहे. त्यामुळे एकूण उपरोक्त कामाची व्याप्ती विचारात घेता आणि अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे यापूर्वी हस्तांतरित झालेल्या मिळकतींची माहिती कागदपत्रे अद्यावत करणे, ज्या मिळकतींना महानगरपालिकेचे नाव लावले नाही ते नाव लावण्या संदर्भातील कार्यवाही करणे इत्यादी कामांसाठी पुरेसा वेळ कर्मचाऱ्यांना उपलब्ध होऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

सबब उपरोक्त मनुष्यबळाबाबतची परिस्थिती तसेच कामाची व्याप्ती विचारात घेता यापूर्वी ज्या पध्दतीने सेवानिवृत्त महसूल अधिकारी यांचे हंगामी पथक नियुक्त करण्यात आले होते त्याच धर्तीवर नवीन पथ स्थापन करून उर्वरित मिळकती संदर्भात नाव लावणे बाबत पाठपुरावा करणेबाबत कार्यवाही करणे संयुक्तीक राहील असे खात्याचे मत आहे.

मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील संकेतस्थळ अंतर्गत मिळकती विषयक सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयाने अद्ययावत करण्याची कार्यवाही खात्यामार्फत सुरू आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी सदरचा ॲक्सेस उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

अशा आशयाचा मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.३/१२५**

संदर्भ – १) मा.तुपे प्रशांत वसंतराव व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे २/७/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३८८,दि.२/७/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, तसेच शिक्षण मंडळ आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ लि (PMPML) चे सर्व आजी व माजी सदस्य यांनी पुणे शहराच्या विकासात, लोकसेवेत आणि प्रशासकीय कामकाजात मोलाचे योगदान दिले आहे व देत आहेत. सद्यस्थितीत वाढते वैद्यकीय खर्च आणि आरोग्याच्या वाढत्या समस्या लक्षात घेता, या सर्व आजी–माजी लोकप्रतिनिधींना व सदस्यांना तसेच त्यांच्या कुटुंबाला सामाजिक व आरोग्य विषयक सुरक्षा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना राबविली जाते. या योजनेची व्याप्ती वाढवून लोकप्रतिनिधी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांना वैद्यकीय कवच देणे आवश्यक आहे.पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, शिक्षण मंडळाचे सर्व आजी व माजी सदस्य, तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.( PMPML) चे सर्व आजी व माजी सदस्य यांना तसेच त्यांचे पती / पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली दिव्यांग अपत्ये यांना पुणे महानगरपालिकेच्या विभागामार्फत सुरू असलेल्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य कायमस्वरूपी लाभ देण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.४/१२६**

संदर्भ – १) मा.अजय अप्पासाहेब खेडेकर व मा.स्नेहा नामदेव माळवदे यांचे दि.१६/३/२०२६ चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१७,दि.२७/३/२०२६
३) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/आरोग्य/१५३,दि.४/६/२०२६ अन्वये दिलेला अभिप्राय
४) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.६६,दि.१८/६/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे व महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

कै.सावित्रीबाई फुले प्रसूतिगृह, गुरूवार पेठ येथे प्रसूतिगृह हे बंद न करता तळ मजला येथे सध्या कार्यरत असलेल्या बाह्यरूग्ण विभागामध्ये उपलब्ध होणाऱ्या जागेमध्ये ५ बेड्चे डायलेसिस सेंटर करणेस आरोग्य विभागाची हरकत नाही अशा आशयाचा मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.५/१२७</u>**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/इओ/२१९,दि.२९/६/२०२६ रोजीचे पत्र
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.७६,दि.७/७/२०२६

––––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपा प्रभाग क्र.०२ येथील डॉ.नानासाहेब परूळेकर विदयालय ( कन्या शाळा ) येथे मराठी माध्यम इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा महाविद्यालय सुरू करणेबाबतच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) डॉ.नानासाहेब परूळेकर विदयालय ( कन्या शाळा ) येथे मराठी माध्यम इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा महाविद्यालय सुरू करणेचा प्रस्ताव.

२) मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव मे.राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करणेस.

३) मे.राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर डॉ.नानासाहेब परूळेकर विदयालय ( कन्या शाळा ) विश्रांतवाडी येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा महाविद्यालय सुरू करणेसाठी जाहीर प्रकटन देवून, पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी यांचे संयुक्त विद्यमाने सुरू करणेस व सदर संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार उपआयुक्त ( माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग ) यांना देणेस.

**<u>विषय क्र.६/१२८</u>**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/इओ/१२४,दि.१९/५/२०२६ रोजीचे पत्र
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.८०,दि.७/७/२०२६

––––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका संचलित राजीव गांधी ई–लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज शिवदर्शन, पर्वती, पुणे येथे इयत्ता ११ वी आणि इयत्ता १२ वी विज्ञान हे महाविद्यालय चालविणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१)** शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून राजीव गांधी ई–लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज, शिवदर्शन, पर्वती, पुणे इयत्ता ११ वी आणि १२ वी विज्ञान हे महाविद्यालय ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या पात्र संस्थेला चालविणेकामी देणेस तसेच भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीने निश्चित केलेले भाडे आकारणेस.

**२)** शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून राजीव गांधी ई–लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज, शिवदर्शन, पर्वती, पुणे इयत्ता ११ वी आणि १२ वी विज्ञान हे महाविद्यालय ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या पात्र संस्थेला चालविणेस देणेकामी संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार उपआयुक्त ( माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग ) यांना देणेस.

**३)** पेस एज्युकेशनल ट्रस्ट संस्थेकडील सर्व व्यवस्थापन ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या संस्थेकडे हस्तांतरीत करणेस.

**<u>विषय क्र.७/१२९</u>**

संदर्भ– १) मा.सुहास टिंगरे यांचे दि.२५/६/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३४४,दि.२५/६/२०२६
३) मा.अति.महा.आयुक्त ( इ ) यांचेकडील जा.क्र.मआ/अग्निशमन/२६५,दि.६/७/२०२६ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४६,दि.१६/७/२०२६

-----

मा.अति.महा.आयुक्त ( इ ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरामध्ये आधुनिक Fire Hydrant Network विकसित करणे व विद्यमान Fire Hydrant व्यवस्था पुनर्जीवित करण्याबाबतचा मा.अति.महा.आयुक्त ( इ ) यांनी खालीलप्रमाणे पाठविलेला अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

पुणे शहरामध्ये आधुनिक Fire Hydrant Network विकसित करणे व विद्यमान Fire Hydrant व्यवस्था पुनर्जीवित करण्याबाबतचा अभिप्राय अग्निसुरक्षेच्या तांत्रिक दृष्टिकोनातून देण्यात आलेला असून, प्रकल्पाचा सविस्तर तांत्रिक आराखडा, जलदाब व जलप्रवाहासंदर्भातील अभियांत्रिकी विश्लेषण, अंदाजपत्रक, आर्थिक तरतूद व अंमलबजावणीबाबतचा अंतिम निर्णय सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विभागांच्या तांत्रिक समन्वयातून घेण्यात यावा.

सदर उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास पुणे शहर हे आधुनिक, शाश्वत, वैज्ञानिक व एकात्मिक Fire Hydrant Network विकसित करणाऱ्या देशातील अग्रगण्य महानगरांपैकी एक म्हणून विकसित होईल. यामुळे अग्निशमन दलाची कार्यक्षमता, आपत्कालीन प्रतिसाद क्षमता तसेच मोठ्या आगींवर नियंत्रण मिळविण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी अत्यंत प्रभावी, विश्वासार्ह व दीर्घकालीन सार्वजनिक सुरक्षा पायाभूत सुविधा निर्माण होईल.

**<u>विषय क्र.८/१३०</u>**

संदर्भ– १) कार्यालयाकडील जा.क्र.१७१४,दि.१४/८/२०२५ अन्वये मे.प्रितम एन्टरप्रायजेस यांना देण्यात आलेला कार्यादेश.
२) मा.तांत्रिक छाननी समिती ठ.क्र.२६०,दि.२०/११/२०२५ अन्वये मान्य पूर्वगणनपत्रक
३) मा.महापालिका आयुक्त यांची ठ.क्र.६/७५९,दि.१९/१/२०२६ अन्वयेची प्रशासकीय मान्यता.
४) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/प्रकल्प/२७८,दि.१३/७/२०२६ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७६,दि.१६/७/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

साखर संकुल ते जुना पुणे–मुंबई रस्ता येथे उड्डाणपूल /ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.७५ कोटी इतक्या रकमेचे दायित्व पत्करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) साखर संकुल ते जुना पुणे–मुंबई रस्ता येथे उड्डाणपूल /ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.७३,५१,६९,२५०/– इतक्या रक्कमेचे दायित्व पत्करणेस.

२) सदर कामासाठी सन २०२६–२७ व २०२७–२८ या आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने तरतूद उपलब्ध करणेस.

**विषय क्र.९/१३१**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/भवन/३०१,दि.१६/७/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९२,दि.१६/७/२०२६

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

धर्मवीर संभाजी महाराज शाळा, नवी पेठ येथील जुनी इमारत पाडून नव्याने बांधणे या कामाकरिता आवश्यक एकूण र.रू.१७.६७ कोटी इतकी तरतूद उपलब्ध होणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७२(ब) नुसार तरतूद उपलब्ध करणेस.

त्यानुषंगाने नमूद आर्थिक वर्ष निहाय CE12A422/J2-113 व CE12A422/SJ2-1428 या अर्थशीर्षकावरील उपलब्ध र.रू.६४४.२२५ लक्ष सन २०२६-२७ साठी तरतूद व उर्वरित र.रू.११.१६५ कोटी ही पुढील आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये उपलब्ध होणेकामी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१०/१३२**

संदर्भ- १) मा.मंजुषा दीपक नागपुरे, महापौर,पुणे यांचे दि.१५/७/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९५,दि.१६/७/२०२६

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी कार्बन क्रेडिट धोरण राबविणे व कार्बन क्रेडिटमधून महसूल प्राप्त करण्याबाबतच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेने तातडीने कार्बन क्रेडिट सेल स्थापन करावा.
२) महानगरपालिकेच्या सर्व विभागांतील कार्बन क्रेडिटसाठी पात्र प्रकल्पांचे सर्वेक्षण व सूची तयार करावी.
३) प्रत्येक पात्र प्रकल्पाचे उत्सर्जन कमी होण्याचे वैज्ञानिक मोजमाप करून अधिकृत नोंदणीची प्रक्रिया सुरू करावी.
४) आवश्यक असल्यास तज्ज्ञ संस्था / सल्लागार यांची नियुक्ती करावी.
५) कार्बन क्रेडिटच्या विक्रीतून मिळणारा निधी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, हरित उर्जा, नदी पुनरूज्जीवन, उद्याने व नागरिकाभिमुख विकासकामांसाठी वापरण्याचे धोरण निश्चित करावे.
६) या संपूर्ण प्रक्रियेचा सविस्तर अहवाल सहा महिन्यांत स्थायी समिती व सर्वसाधारण सभेसमोर सादर करावा.

**विषय क्र.११/१३३**

संदर्भ- १) मा.अमोल बालवडकर व मा.सुहास टिंगरे यांचे दि.१६/७/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९७,दि.१६/७/२०२६

विषय- स्वर्गीय अजितदादा पवार यांचा स्मृतींना अभिवादन करण्याच्या उद्देशाने पुणे महानगरपालिकेने दि.२२ जुलै पासून संपूर्ण पुणे महानगरपालिका हद्दीत स्वच्छता अभियान सप्ताह राबविणेबाबत.

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

महाराष्ट्र शासनाने स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती दि.२२ जुलै रोजी राज्यभर साजरी करण्याचा

निर्णय घेतलेला आहे. पुणे जिल्ह्याच्या विकासाचे खरे शिल्पकार म्हणून ओळख असलेल्या स्वर्गीय अजितदादा पवार यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात स्वच्छता, टापटीप, शिस्त आणि सुबक व्यवस्थापनाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. स्वच्छ आणि सुंदर परिसर हीच खरी लोकसेवा असल्याचा त्यांचा दृष्टीकोन सर्वश्रुत होता. त्यांच्या कार्याचा आदर्श जपत आणि त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या उद्देशाने पुणे महानगरपालिकेने दि.२२ जुलैपासून संपूर्ण पुणे महानगरपालिका हद्दीत स्वच्छता अभियान सप्ताह राबविण्यात यावा. या अभियानांतर्गत सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक, शाळा, उद्याने, सार्वजनिक शौचालये, नाले, कचरा संकलन केंद्रे तसेच इतर सार्वजनिक ठिकाणांची विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात यावी. नागरिक, स्वयंसेवा संस्था, शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना, गृहनिर्माण संस्था तसेच विविध सामाजिक संघटनांच्या सक्रिय सहभागातून व्यापक जनजागृती करण्यात यावी. तसेच स्वच्छता, कचरा वर्गीकरण, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ठिकाणांची निगा राखण्याबाबत विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात यावेत. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्याला आणि विचारांना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या स्वच्छ, शिस्तबध्द आणि विकसित शहराच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरविणे होय. त्यामुळे हा स्वच्छता अभियान सप्ताह प्रभावीपणे राबवून पुणे शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.१२/१३४</u>**

संदर्भ – १) मा.रूपाली धाडवे , मा.विशाल धनवडे, मा.प्रशांत जगताप व मा.वैशाली बनकर यांचे दि.१६/७/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५०२,दि.१६/७/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, तसेच शिक्षण मंडळ आणि पुर्व पुणे महानगर परिवहन महामंडळ लि (पीएमटी) चे सर्व आजी व माजी सदस्य यांनी पुणे शहराच्या विकासात, लोकसेवेत आणि प्रशासकीय कामकाजात मोलाचे योगदान दिले आहे व देत आहेत. सद्यस्थितीत वाढते वैद्यकीय खर्च आणि आरोग्याच्या वाढत्या समस्या लक्षात घेता, या सर्व आजी–माजी लोकप्रतिनिधींना व सदस्यांना तसेच त्यांच्या कुटुंबाला सामाजिक व आरोग्य विषयक सुरक्षा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना राबविली जाते. या योजनेची व्याप्ती वाढवून लोकप्रतिनिधी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांना वैद्यकीय कवच देणे आवश्यक आहे.पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, शिक्षण मंडळाचे सर्व आजी व माजी पुर्व सदस्य, तसेच पुणे महानगर परिवहन उपक्रम समिती (पीएमटी) चे सर्व आजी व माजी सदस्य यांना तसेच त्यांचे पती / पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली दिव्यांग अपत्ये यांना पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सुरू असलेल्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य कायमस्वरूपी लाभ देण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.१३/१३५</u>**

संदर्भ – १) मा.ऐश्वर्या अतुल पाटील व मा.कोमल सारंग नवले यांचे दि.२४/४/२०२६ चे पत्र.

२) मा.शिक्षण समिती ठराव क्र.१५,दि.२४/४/२०२६

-----

मा.शिक्षण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

लोहगाव मधील हरणतळे भागामध्ये असणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या शाळेत सद्यस्थितीमध्ये इयत्ता ४ थी पर्यंतचे शिक्षण दिले जाते. या शाळेच्या परिसरात इयत्ता ५ वी आणि त्यापुढील शिक्षणासाठी या भागात कोणतीही इतर शासकीय शाळा उपलब्ध नाही. यामुळे गरीब व गरजू विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून, त्यांचे प्राथमिक शिक्षण अर्धवट राहण्याची भीती निर्माण झाली आहे. या संदर्भात शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांनी एकत्र येऊन आपल्याच ( आहे त्याच ) शाळेत ५ वी चा वर्ग सुरू करण्याबाबतचा ठराव एकमताने मंजूर केला आहे. तरी शाळेकडे पुढील वर्ग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली वर्गखोली (Infrastructure ) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि नैसर्गिक वाढ (Natural Growth) विचारात घेता, शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ पासून या शाळेत इयत्ता ५ वी चे वर्ग सुरू करणेस व त्यासाठी लागणारी सर्व व्यवस्था शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**योगिता भोसले ,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.